# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/06/2023 (शुक्रवार) सकाळ

---

### अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
### पोलीस स्टेशन पारशिवनीची कार्यवाही

दिनांक ०१/०६/२०२३ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथील स्टाफ रामटेक उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे पारशिवनी हद्दीतील मौजा पारडी शिवार येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रक व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून मौजा पारडी शिवार येथे पारशिवनी पोलिस स्टाफ यांनी ट्रक क्रमांक एम. एच.–४०/वाय– ०६०५ चे चालक नामे –फुलचंद रामकुमार कश्यप, वय ४९ वर्ष, रा. वलनी माईन्स, वार्ड नं. ०३ ता. सावनेर २) ट्रक क्रमांक एम. एच.–४० वाय– ०४०५ चे चालक नामे –महेश जगदिश कोसरे, वय ३६ वर्ष, रा. कोराडी पांजरा, वार्ड नं. ०१ ता. कामठी ३) तबरेज सिध्दीकी, रा. दहेगाव रंगारी हे ट्रक व्दारे अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्यांच्या ताब्यातून १) ट्रक क्रमांक एम. एच.–४० वाय– ०६०५ किंमती अंदाजे १५,००,०००/– रू. २) ट्रक क्रमांक एम. एच.–४० वाय– ०४०५ किंमती अंदाजे १५,००,०००/– रू. ३) दोन्ही ट्रकमधील प्रत्येकी ५ ब्रास प्रमाणे एकुण १० ब्रास रेती किंमती ५०,०००/– रू. ४) वाळु साठयाचे ठिकाणावरील अंदाजे १००० ब्रास रेती किंमती ५०,००,०००/– रू. ५) एक पोकलेन मशिन किंमती ४०,००,०००/– रू. असा एकुण १,२०,५०,०००/– रूपयाचा मुद्देमाल आरोपीतांच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मढे पोस्टे पारशिवनी मो. नं. ९४०३९५१२३६ हे करीत आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०.५ कि.मी. अंतरावरील मौदा येथे दिनांक ३१/०५/२०२३ चे १०.०० वा. ते दिनांक ०१/०६/२०२३ चे ०.०३ वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजु चुडामन नाकाडे, रा. मौदा याचे घरी आत प्रवेश करून फिर्यादीचे घरून १० ग्रॅम सोन्याची पोत किंमती अंदाजे ३०,०००/– रु, ०२ ग्रॅमचे ०२ अंगठी किंमती अंदाजे २५००/– रु, ०१ ग्रॅम सोन्याची मनगटी २५००/– रु, पायातील चांदीचे चाळ किंमती अंदाजे ५००/– रु व नगदी १७,०००/–रु असा एकुण ५२,५००/–रुपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक चौधरी पोलीस स्टेशन मौदा हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर